महाराष्ट्र शासन

क्रमांक: डी एम यु-२०२०/प्र. क्र.९२/आ.व्य.प्र.-१,
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ जून २०२०.

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) महानगरपालिका आयुक्त (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)

**विषय :- मंगल कार्यालयामध्ये लग्नसमारंभ साजरा करण्यास परवानगी देणेबाबत.**

**संदर्भ :-** महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्रमांक. डी एम यु-२०२०/प्र. क्र.९२/आ.व्य.-१, दिनांक ३१ मे, २०२०.

कोरोना विषाणूचा राज्यातील वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता लॉकडाऊन दरम्यान गर्दी टाळण्याच्या दृष्टीने केवळ ५० लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग पाळत लग्न समारंभ साजरा करण्याची परवानगी संदर्भिय आदेशान्वये देण्यात आलेली आहे. तथापि, हे लग्न समारंभ कोणकोणत्या ठिकाणी पार पाडता येतील याबाबतचा उल्लेख सदर आदेशांमध्ये नाही. ५० लोकांच्या मर्यादेत घराच्या परिसरात लग्न समारंभ साजरे करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे ५० लोकांच्या मर्यादेतच सोशल डिस्टंसिंग पाळून खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल/ सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास परवानगी देण्याबाबतच्या विविध मागण्या शासनाकडे प्राप्त होत आहेत.

वरील सूचना व मागणी विचारात घेता तसेच आता पावसाळा सुरू झाला असल्यामुळे, खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल/ सभागृह, घर व घराच्या परिसरात ५० लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग तसेच कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करण्याच्या अटीवर लग्न समारंभ पार पाडण्यास, नागरिकांकडून मागणी प्राप्त झाल्यास परवानगी देण्यात यावी.

किशोरराजेनिंबाळकर

(किशोर राजे निंबाळकर)
सचिव (आ.व्य., म व पु)

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

**Office Of District Magistrate Buldhana - 443001**
Telephone No. 07262-242307/242411

क्रमांक गृहविभाग कक्ष 4(5)/कावि/713 /2020

दिनांक :- 24 /06/2020

प्रति,

1.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि.प.बुलडाणा

2.मुख्याधिकारी, नगर परिषद ----------------------

**विषय :-** मंगल कार्यालयामध्ये लग्नसमारंभ साजरा करण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ:-** 1.महसुल व वन आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांचे आदेश क्रमांक, डीएमयु-2020/प्र.क्र.92/आ.व्य.-1, दिनांक 31 मे 2020

2.महाराष्ट्र शासन आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.डीएमयु- 2020/प्र.क्र.92/आ.व्य.प्र.1 दिनांक 22 जुन 2020

राज्यातील कोरोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाचे संदर्भिय आदेशान्वये लॉकडाऊन दरम्यान गर्दी टाळण्याच्या दृष्टीने केवळ 50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग पाळत लग्न समारंभ साजरा करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. 50 लोकांच्या मर्यादेत घराच्या परिसरात लग्न समारंभ साजरे करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे खुले लॉन , विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास परवानगी देण्याबाबतच्या विविध मागण्या शासनाकडे प्राप्त होत असल्याने शासनाने वरील सूचना व मागणी विचारात घेता तसेच आता पावसाळा सुरु झाला असल्यामुळे खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय/हॉल/सभागृह, घर व घराच्या परिसरात 50 लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग तसेच कोविड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्याच्या अटीवर लग्न समारंभ पार पाडण्यास नागरिकांकडुन मागणी प्राप्त झाल्यास परवानगी देण्यात यावी अशा सुचना संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रात नागरिकांकडुन लग्न समारंभ पार पाडण्यास मागणी प्राप्त झाल्यास संबंधितांना सोशल डिस्टंसिंग तसेच कोविड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात यावी.

अपर जिल्हादंडाधिकारी बुलडाणा

प्रतिलिपी –

1.जिल्हा पोलीस अधिक्षक बुलडाणा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
2.उपविभागीय अधिकारी ---------------- यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
3.तहसिलदार,--------------------- यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

अपर जिल्हादंडाधिकारी बुलडाणा

o/c

Scanned by CamScanner